# प्रेसनोट

दि.02 / 02 / 2023

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग / घटक | नाशिक / अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीरामपूर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 |
| आरोपीचे नांव व कार्यालय | नवनाथ अशोक थोरात, वय–38 वर्ष, पद–राखणदार, नैमित्यिक कामगार, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, टिळकनगर मळा, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर. |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | 5,000/– रुपये तडजोडी अंती 3,000/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | 3,000/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे शेती व्यवसाय करत असून, त्यांची उक्कलगांव, ता. श्रीरामपूर येथील गट नं.302/4 मधील 12 एकर वडीलोपार्जित शेत जमीन त्यांचे पणजोबा यांनी शेती महामंडळ, टिळकनगर यांचेकडे खंडण्यासाठी सन 1970 मध्ये दिली होती. त्यानंतर 1997–98 मध्ये मा.महसुल आयुक्त, नाशिक यांच्या आदेशान्वये उक्कलगांव शिवारातील शेत गट नं.168 मध्ये 4 एकर क्षेत्र तक्रारदार यांचे पणजोबा यांच्या नावे तक्रारदार यांच्या कुटूंबियांना कसण्यासाठी मिळाली आहे. सदर शेत जमीनीचा 7/12 उता–यावर वारसा प्रमाणे सन 2006 पर्यंतची वारस नोंद बरोबर लावण्यात आली होती. सन 2006 मध्ये तक्रारदार यांच्या आईचे नाव वारस म्हणुन 7/12 उता–यावर नोंद लावण्यात आली होती. परंतू सन 2007 पासुन 7/12 उता–यावर आईचे नाव नसल्याचे तक्रारदार यांना 2013 मध्ये लक्षात आले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांच्या आईचे नाव उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडे अपिल अर्ज केला होता. त्यावर सन 2020 पर्यंत कोणताही आदेश पारित झाला नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी पुन्हा आईच्या नावे उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांच्याकडे वारस हक्काप्रमाणे 7/12 वर नाव नमुद करण्यासाठी डिसेंबर 2022 मध्ये अर्ज केला आहे, त्यावर निर्णय अद्याप प्रलंबित आहे. सदर जमीन तक्रारदार स्वतः कसत आहेत. दि.29/01/2023 रोजी आरोपी लोकसेवक नवनाथ अशोक थोरात, वय–38 वर्ष, पद–राखणदार, नैमित्यिक कामगार, वर्ग–4, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, टिळकनगर मळा, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांना फोन करुन सांगितले की, सदर जमीन ही महाराष्ट्र शेती महामंडळाच्या नावे असून ती तु कसु नये, जर ती जमीन तुला कसायची असेल तर तु मला 5000/– रुपये दिले तर मी तुला शेती महामंडळ टिळकनगर ची काही अडचण येवू देणार नाही, असे म्हणून लाच मागणी केली. त्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी आज दि.02/02/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे दिली. सदर तक्रारीचे अनुषंगाने आज रोजी बेलापूर, ता.श्रीरामपूर येथे पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक नवनाथ अशोक थोरात यांनी तक्रारदार यांच्याकडे 5,000/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 3,000/– रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याचे मान्य केल्याचे स्पष्ट निष्पन्न झाले. त्यावरुन आज दि.02/02/2023 रोजी बेलापूर नाका, प्राची फरसाण दुकानाजवळ, लाचेचा सापळा आयोजित केला असता आरोपी लोकसेवक नवनाथ अशोक थोरात याने तक्रारदार यांच्याकडुन पंचासमक्ष 3000/– रुपये लाच स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(शरद गोर्डे)

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर